MHST200025012020

**<u>वि.दि.दा.क्र.४२४/२०२३ मधील निशाणी क्र.२३ वरील आदेश</u>**

वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

३. वादीने असे कथन केले आहे की, वादीने सदरचा दावा प्रतिवादीविरुद्ध वाटप व ताकीद मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी क्रं.१ ने दावा कलम १अ या मिळकतीचे अभिलेखात त्याचे एकटयाचे असणाऱ्या नावाचा गैरफायदा घेऊन सर्वे नं.३४/२२+२० यामधील ० हे ८५ आर याबाबत बिनभरण्याचा व बिनकब्जाचा भाडेपट्टा करार नयन संजय बुराडे व आदित्य संजय बुराडे यांचे नावाने दि.२५.०२.२०२१ रोजी अस्तीत्वात आणले. त्यामुळे तिने अशी विनंती केली की, सदर नयन संजय बुराडे व आदित्य संजय बुराडे यांना दाव्यात प्रतिवादी क्रं.८ व ९ म्हणुन सामील करुन घेण्यात यावे. तसेच अर्जात नमुद केल्याप्रमाणे दावा कलम ५अ व विनंती कलम १०अ नंतर कलम १०अ-(१) असे नव्याने समाविष्ट करण्यात यावे. सबब, सदरचा अर्ज मंजुर करणेत यावा.

४. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर नि.२६ नुसार म्हणणे देवुन असे कथन कले की, वादीने जानेवारी २०२२ मध्ये दावा दाखल केलेला आहे. त्यापुर्वी एक वर्ष आधी प्रतिवादी याने दावा मिळकतीपैकी सर्वे नं.३४/२२+२० मधील क्षेत्राचा दस्त क्रं. १८५/२०२१ ने भाडेपट्टा करारनामा २५ वर्षासाठी करुन दिलेला आहे. केवळ प्रतिवादी यांना त्रास देणेच्या हेतुने वादीने प्रतिवादी क्रं.८ व ९ यांना दाव्यात सामील करण्याचा सदरचा अर्ज दिलेला आहे. तसेच वादीने दावा कलम ५अ मध्ये जी दुरूस्ती करुन मागितलेली आहे ती योग्य व कायदेशीर नाही. वादीला दावा मिळकतीत कोणताही हिस्सा

नसल्याने तिला वाटप करुन देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. दावा कलम ५अ मध्ये ज्या मागण्या नमुद केलेल्या आहेत त्या मागण्या मिळणेस वादी कधीही पात्र नाही. त्याचप्रमाणे दावा कलम १अ(१) मध्ये जी दुरूस्ती करुन मागितली आहे ती पुर्णपणे चुकीची आहे. सदरचा दावा सन २०२२ मध्ये दाखल असुन प्रतिवादीने करुन दिलेला भाडेपट्टा दि.२५.०२.२०२१ रोजीचा आहे. त्यामुळे सदर दस्तास lis pendency तत्वाची बाधा येत नाही. वादीस भाडेकरारनाम्याबाबत ठराव करुन मागणेचा हक्क अधिकार नाही. वादीचे मागणीनुसार दुरूस्ती झालेस प्रतिवादी यांचे कधीही पैशात भरुन न येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा.

५. अर्ज व म्हणणे याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांनी सदरचा दावा वाटप व निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यात अदयाप पुराव्याचे कामकाज सुरु झालेले नाही. तसेच सदरचा दावा सन २०२२ सालचा असुन सदरचा अर्ज वादी यांनी दि.१८.०४.२०२२ रोजी दाखल केलेला आहे. सदर दुरुस्ती दाव्यामध्ये करण्यास परवानगी दिल्यास प्रतिवादींचे कसलेही नुकसान होईल असे वाटत नाही. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये बदल होत नाही. तसेच सदरची दुरूस्ती ही योग्य आहे किंवा कसे याचा विचार अर्ज मंजुर करताना करायची आवश्यकता नाही. प्रतिवादींना सदर दुरूस्ती केल्यानंतर जादा कैफियत दाखल करण्याची मुभा उपलब्ध आहे. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दावा दाखल केल्यापासुन केवळ ०३ महिन्याने दाखल केला असल्याने खर्चाबाबत कोणताही आदेश पारीत करण्यात येत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

## <u>आदेश</u>

१) अर्ज मंजुर करण्यात येतो.

२) वादीने अर्जात नमुद केलेप्रमाणे १४ दिवसांचे आत दुरुस्ती करुन दावा दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३) खर्चाबाबत आदेश नाही.

ANKUSH ATMARAM PACHARNE

Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2025.11.01 17:52:07 +0530

स्थळ : वाई.
दिनांक : २८.१०.२०२५

( ए.ए.पाचरणे )
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाई.